follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २६३ * सातारा * सातारा * गुरूवार * दि. ६ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# सत्ता स्थापनेसाठी हालचालींना वेग

## पंतप्रधान मोदींचा राजीनामा राष्ट्रपतींकडून मंजूर; काळजीवाहू पंतप्रधान म्हणून जबाबदारी सांभाळणार

**दिल्ली :** लोकसभा निवडणुकांचे निकाल समोर आले. एनडीएने मोठी आघाडी घेत बहुमत मिळवले. दरम्यान, आता राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे.एनडीए तिसऱ्यांदा सत्तेवर येणार आहे. त्यासाठी दिल्लीत हालचालींना वेग आला आहे. नव्या सरकारच्या शपथविधीची तारीख आणि वेळही निश्चित करण्यात आली आहे. ८ जून रोजी संध्याकाळी पंतप्रधाननरेंद्र मोदीयांचा शपथविधी सोहळा होऊ शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.काँग्रेसने उबाठासाठी योग्य काम केले नाही, पुष्पगुच्छ घेऊन राहुल गांधींना भेटणारनरेंद्र मोदीतिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारतिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेताच नरेंद्र मोदींच्या नावावर एक नवा विक्रम होणार आहे. सलग तिसऱ्यांदा निवडणूक जिंकून देशाचे पंतप्रधान होणारे ते देशातील दुसरे नेते बनतील. यापूर्वी हा विक्रम जवाहरलाल नेहरूंच्या नावावर होता. आज दुपारी ४ वाजता दिल्लीत एनडीएची बैठक बोलावण्यात आली आहे. यात जेडीयू प्रमुख नितीश कुमार, टीडीपी प्रमुख एन चंद्राबाबू नायडू आणि इतर नेते सहभागी होणार आहेत. एनडीएच्या मित्रपक्षांशी चर्चेनंतर भाजपच्या संसदीय मंडळाची बैठक होणार आहे. यामध्ये सरकार स्थापनेची



रुपरेषा आणि शपथविधी यावर चर्चा होणार आहे. जेडीयू प्रमुख नितीश कुमार बुधवारी सकाळी दिल्लीत पोहोचले. चंद्राबाबू नायडूही दुपारपर्यंत दिल्लीला पोहोचू शकतात. २०१९ च्या निकालानंतर ७ दिवसांनी पंतप्रधानपदाचा शपथविधी सोहळा पार पडला होता. २०१४ मध्ये जेव्हा छळ-सरकार स्थापन झाले तेव्हा १० दिवसांनी मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती.लोकसभेचा निकाललोकसभा निवडणुकीत एनडीएने बहुमत मिळवले आहे. एनडीएने २९२ जागा जिंकल्या. तर इंडिया आघाडीने २३४ जागा जिंकल्या आहेत. तर अपक्ष ७ उमेदवार जिंकले आहेत.

### ८ जूनला शपथविधी होण्याची शक्यता

**बुधवारी (५ जून) भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी अध्यक्ष द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊ शकतात. सूत्रांनी एबीपी न्यूजला दिलेल्या माहितीनुसार, या काळात पंतप्रधान मोदी सरकार स्थापनेला पाठिंबा देणारं पत्र राष्ट्रपती मुर्मू यांना सुपूर्द करू शकतात.**

बहुमत मिळालं असून पंतप्रधान नरेंद्र मोदी (झच् छरीशपवीर चेवळ) तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होणार आहेत. अशातच एनडीएनं सत्ता स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. येत्या ८ जून रोजी नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगानं एनडीएनं पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. अशातच नरेंद्र मोदींनी आपल्या आज (५ जून) पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान मोदींचा राजीनामा मंजूर केला असून मोदी आतापासून काळजीवाहू



पंतप्रधान म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रपती भवनात दाखल झाले आणि त्यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला. राष्ट्रपती मुर्मूंनी हा राजीनामा स्विकारला असून आजपासून मोदी देशाचे काळजीवाहू पंतप्रधान म्हणून पद-ावर कायम राहणार आहेत. एनडीए बैठकीआधी लोकसभा भंग करण्याची औपचारिक माहिती देण्यासाठी पंतप्रधान मोदी राष्ट्रपती भवनात दाखल झाल्याचं कळतंय.

शुक्रवारी (७ जून) दुपारी २.३० वाजता संसद भवनात एनडीएच्या खासदारांची बैठक होणार असल्याचंही सूत्रांनी सांगितलं आहे. या बैठकीला एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विविध पक्षांचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. दुसऱ्या दिवशी म्हणजेच ८ जून रोजी नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेऊ शकतात.

# उत्तरेत काँग्रेस एकवटल्या पण भाजपची लक्षवेधी कामगिरी

## शशिकांत शिंदेंना अल्प मताधिक्य



**कराड :** सातारा लोकसभा मतदारसंघाचा निकाल सोमवारी जाहीर झाला. यात भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले विजय झाले. कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवारापेक्षा राष्ट्रवादीच्या उमेदवाराने १ हजार ७२४ मते जादा घेतली असली तरी दोन्ही काँग्रेस एकवटूनही त्यांना मिळालेले अत्यल्प मताधिक्य विद्यमान आमदारांसाठी धोक्याची घंटा असून त्यांच्यावर आत्मचिंतनाची वेळ आली आहे असेच म्हणावे लागेल.

कराड तालुका हा सातारा जिल्ह्यात सर्वात मोठा तालुका म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथे पहिल्यापासूनच कराड दक्षिण व उत्तर असे विधानसभेचे दोन मतदारसंघ आहेत. कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात कराड, सातारा ,कोरेगाव व खटाव या चार तालुक्यातील मतदारांचा समावेश असल्याने हा मतदारसंघ किचकट म्हणून पाहिला जातो.

कराड उत्तर मतदार संघातून आजवर काँग्रेस विचाराच्या उमेदवारानेच नेतृत्व केले आहे. तर विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील सलग ५ वेळा या मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत. सध्या मात्र भाजप कराड उत्तरचे नेते मनोज घोरपडे, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मतदारसंघात बरेच हातपाय पसरल्याचे या निकालाने स्पष्ट झाले आहे. मनोज घोरपडे यांनी मतदारांशी ठेवलेला सततचा संपर्क, तळागाळापर्यंतच्या लोकांना शासनाच्या योजना पोहोचवण्याचे केलेले काम या साऱ्याचे फळ या निकालात दिसत आहे.

कराड उत्तर मतदार संघात उदयनराजे भोसले यांच्या सातारा तालुक्यातील वर्णे व नागठाणे या २ जिल्हा परिषद गटांचा समावेश होतो. तसेच आमदार शशिकांत शिंदे यांच्या कोरेगाव तालुक्यातील वाठार किरोली जिल्हा परिषद गट व रहिमतपुर नगर परिषदेचा समावेश याच मतदारसंघात होतो. त्यामुळे हा मतदारसंघ दोघांचेही बलस्थान म्हणून पाहिला जात होता.येथे दोघांचीही प्रतिष्ठा पणाला लागली होती.

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात लोकसभेसाठी २ लाख ९६ हजार ९४५ मतदार होते. पैकी १लाख ९४ हजार २९ म्हणजे ६५.३४ % मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. पैकी खासदार उदयनराजे भोसले यांना ८८ हजार ९३० तर आमदार शशिकांत शिंदे यांना ९० हजार ६५४ मते मिळाली. याशिवाय इतर उमेदवारांनी घेतलेली मते वेगळीच .पण शशिकांत शिंदे यांनी १ हजार ७२४ मतांची आघाडी येथे घेतली आहे.

विरोधकांना आला ताकदीचा अंदाज

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात बऱ्याचदा तिरंगी लढती होत आल्या आहेत. त्यामुळे मत विभाजनाचा फायदा होऊन आमदार बाळासाहेब पाटील यांनी नेहमीच विधानसभेला बाजी मारली आहे. मात्र या लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब पाटील विरोधक एकवटले होते. भाजप कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन केलेल्या प्रयत्नामुळे गत लोकसभा निवडणुकीला सुमारे ५० हजाराचे मताधिक्य राष्ट्रवादी उमेदवाराला घेणाऱ्या बाळासाहेब पाटलांना यावेळी फक्त १ हजार ७२४ मताधिक्यावर येऊन थांबावे लागले आहे. बाळासाहेबांसाठी ही धोक्याची घंटा तर आहेच. पण विरोधकांना आपल्या सामुदायिक ताकदीचा अंदाज या निमित्ताने आला आहे असे म्हटले जात आहे.

# मुस्लिम मतांमुळे उबाठाचे उमेदवार निवडून आले

## मंत्री दिपक केसरकर यांची घणाघाती टीका

**मुंबई :** हिंदुत्व सोडून काँग्रेस सोबत गेलेल्या उबाठाबाबत मुस्लिम समाजाला खात्री झाल्याने त्यांनी लोकसभा निवडणुकीत फतवे काढून उबाठा उमेदवारांना एकगठ्ठा मतदान केले. मुस्लिम मतांमुळेच उबाठाचे उमेदवार निवडून आले, अशी टीका राज्याचे शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांनी केली. निवडणुकीतील महायुतीचा पराभव आम्ही मान्य करतो. चुकलेल्या गोष्टी दूर करुन नव्या दमाने जनतेसमोर पुन्हा जाऊ, असा विश्वास मंत्री दिपक केसरकर यांनी व्यक्त केला.

केसरकर पुढे म्हणाले की, गेल्या दोन दिवसापासून उबाठाकडून महाराष्ट्रात एक वेगळे चित्र तयार केले जात आहे. ज्यात मराठी मतदार शिवसेनेसोबत नाहीत, असा दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र १३ पैकी ७ ठिकाणी आम्ही उबाठा गटाच्या उमेदवारांचा पराभव केला. सगळी मुंबईकरांची मते आणि मराठी मते शिवसेनेला मिळाली. मुंबईतील ८० टक्के मतदार शिवसेनेसोबत होती, असे मंत्री दिपक केसरकर म्हणाले. ज्या ६ ठिकाणी शिवसेनेच्या उमेदवारांचा पराभव झाला तिथे उमेदवारी उशीरा जाहीर केल्याने फटका बसला असल्याचे मंत्री केसरकर यांनी मान्य केले. उबाठाच्या उमेदवारांसाठी मुंबईत फतवे काढण्यात आले होते. अन्यथा उबाठाचे उमेदवार एक ते दीड लाख मतांनी पराभूत झाले असते, असा दावा मंत्री केसरकर यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पराभूत करण्याचा कट पाकिस्तानात रचण्यात आला होता.पाकिस्तानमधील दोन मंत्री मोदींच्या पराभवाचे आवाहन करत होते आणि इथले काहीजण ते ऐकत होते हे दुर्देवी आहे. निवडणुकीत संविधान बदलणार असा खोटा प्रचार करुन दलित बांधवांची दिशाभूल करण्यात आली. मराठा आंदोलना दरम्यान मराठा विरुद्ध ओबीसी असा वाद निर्माण झाला. मात्र निवडणुकीत काही ठिकाणी ठरवून मतदान झाले. ज्यामुळे महायुतीच्या बड्या नेत्यांचा पराभव झाला. याचेही विश्लेषण होणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

ज्या शिवसेनेची कोकणातून सुरुवात झाली त्या सिंधुदूर्गपासून पालघरपर्यंत उबाठाला एकही जागा मिळाली नाही. कोकणी जनता शिवसेनेच्या पाठिशी आहे हे यातून दिसून आले. कोकणातील जनतेने नारायण राणे यांना निवडून दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा या देशाचे नेतृत्व करावे, असा सुस्पष्ट कौल दिला आहे. तुम्हाला विरोधी पक्ष म्हणून कौल मिळाला आहे. बाळासाहेबांनी सत्तेची पर्वा केली नाही. महाराष्ट्राबाबत प्रेम असेल तर उद्धव ठाकरेंनी दिल्लीत जाऊन शरद पवार यांना विरोधी पक्ष पद मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असा टोला मंत्री दिपक केसरकर यांनी लगावला.

# महाराष्ट्रात महायुतीमध्ये नेतृत्वबदलाची शक्यता

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मोजणी सुरू असून त्यात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी बहुमताकडे जात असल्याचा कल दिसून येत आहे. महाराष्ट्रात मात्र महायुती अपेक्षित कामगिरी करताना दिसत नसल्याने आगामी विधानसभा निवडणूक नजरेसमोर ठेऊन निकालानंतर राज्यात नेतृत्वबदल होण्याची शक्यता चर्चेत आली आहे.

लोकसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाने आठ ते नऊ जागांवर निवडणूक लढवावी अशी भाजपची इच्छा होती. मात्र, शिंदे यांनी आग्रहाने महायुती १५ जागा आपल्या पदरी पाडून घेतल्या. निवडणुकीचे कल पाहता शिंदे गटाच्या जागा सहा-साताच्या पलीकडे जाऊ शकत नसल्याने भाजपामध्ये अस्वस्थता आहे. एक संवेदनशील आणि तळागाळापर्यंत उतरून काम करणारा कार्यकर्ता म्हणून प्रतिमा निर्माण करण्यास एकनाथ शिंदे यशस्वी ठरले असले तरीही आपल्या प्रतिमेचा प्रभाव पाडून त्याचे मतात रुपांतर करू शकणारा, करिष्मा असलेला नेता म्हणून शिंदे अपयशी ठरले आहेत अशी भाजपमध्ये भावना आहे. त्यामुळे शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणूक लढविणे अडचणीचे ठरू शकते याची जाणीव भाजपाला होत आहे.

या बाबीचा विचार करून लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राज्यात नेतृत्वबदल करून मुख्यमंत्री पदाची धुरा भाजप स्वतःकडे घेण्याची शक्यता आहे. असे घडल्यास राज्यात भाजपचा चेहरा बनलेले आणि यापूर्वी मुख्यमंत्री पदाची जबाबदारी पार पाडलेले देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद दिले जाणार की त्यासाठी अन्य नेत्याची निवड होणार याबद्दल राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. अभ्यासू तरीही आक्रमक, राजकीय खेळीमध्ये भल्याभल्यांना धोबीपछाड देणारे नेते म्हणून फडणवीस यांची प्रतिमा असली तरी राज्यातील फोडाफोडीच्या राजकारणाला आणि एकूणच राजकारणाचा स्तर खालावण्यास फडणवीस जबाबदार असल्याचा समज जनमानसात निर्माण करण्यात विरोधकांना बऱ्यापैकी यश आले आहे. त्याचप्रमाणे मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीस यांना लक्ष केल्यामुळे समाजात काही प्रमाणात त्यांच्याबद्दल रोष निर्माण झाला आहे.

अन्यपक्षीय नेत्यांची भाजपामध्ये झालेली खोगीर भरती त्यांना वाटण्यात आलेली पदे आणि उमेदवारीची खैरात यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांप्रमाणेच पारंपारिक मतदारांमध्येही मोठ्या प्रमाणात नाराजी आहे.

# महाविकास आघाडीचा पाठिंबा नाकारल्यानेच राजू शेट्टींची राजकीय आत्महत्या

**कोल्हापूर :** महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उमेदवारीसाठी घातलेल्या पायघड्या धुडकावून 'स्वाभिमानी'चे नेतेराजू शेट्टीयांनी एकला चलोच्या घेतलेल्या भूमिकेनेच त्यांची राजकीय आत्महत्या केली, असेच म्हणावे लागेल. निवडणुकीच्या अगोदर संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव 'हातकणंगले'तीलनिवडणूक शेट्टी हे एकतर्फी मारतील, असेच वातावरण होते. मात्र, मागील तीन निवडणुकांप्रमाणे यावेळेलाही सामान्य माणूस आपल्यासोबत राहील, या आत्मविश्वासाने आघाडीने दिलेला हात अक्षरशः लाथाडला आणि तिथेच शेट्टींचा घात झाला. पहिल्या फेरीपासून ते तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले.

महाविकास आघाडीमध्ये जागा वाटप निश्चित व्हायच्या अगोदर 'हातकणंगले'राजू शेट्टींनासोडूनच चर्चा सुरू होती. ही जागा शेट्टींना सोडायचीच म्हणून तिथे आघाडीकडून उमेदवाराचीही तयारी केली नव्हती. शेट्टी यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे व काही काँग्रेस नेत्यांशी चर्चाही केल्या होत्या. धैर्यशील माने यांच्याबद्दलची नाराजी आणि आघाडीची ताकदीमुळे येथे शेट्टी एकतर्फी निवडणूक मारणार, हे निश्चित होते. पण, मागील



निवडणुकीत आघाडीसोबत गेलो आणि पराभव झाला. साखर कारखानदारांसोबत गेल्याने आपला पराभव झाल्याची भावना कार्यकर्त्यांची झाली.

त्यातही उद्धवसेना चालते; पण दोन्ही काँग्रेस आपणाला चालत नसल्याचे उघड वक्तव्य करत आघाडी व महायुतीपासून समान अंतरावर असल्याचे सांगून त्यांनी शेतकऱ्यांची सहानूभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. पण, येथेच त्यांच्या पराभवाचा पाया रचला गेला. दोन्ही काँग्रेसचे नेते अधिक आक्रमक झाले, कोणत्याही परिस्थित उध्दवसेनेने येथे उमेदवार द्यावा, असा आग्रह धरला. त्यातूनच सत्यजीत पाटील-सरुडकर यांचा पत्ता उध्दव ठाकरे यांनी काढला आणि बघता बघता 'हातकणंगले'चे वारे फिरले.

विशेष म्हणजे सरुडकर यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून त्यांच्या विजयाचे भाकीत केले जात होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पहिल्या आठवड्यात सरुडकर आणि शेट्टी यांच्या मध्येच फाईट राहिली; पण शेवटच्या टप्प्यात धैर्यशील माने यांनी लावलेल्या जोडण्यांमुळे शेट्टी तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले.

पदाधिकाऱ्यांचा सल्लाही धुडकावला..

स्वबळावर लढण्यासारखी फौज स्वाभिमानी संघटनेकडे शिल्लक राहिली नाही. त्यामुळे आघाडी बिनशर्त सोबत बोलवत असेल तर जाऊया, असा सल्ला संघटनेतील काही पदाधिकाऱ्यांनी शेट्टींना दिला होता. पण, चार-दोन कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे एकला चलो रे ची भूमिका घेतली आणि पराभवाचे तोंड बघावे लागले.-ऊत्तएठढखडएचएछढराजू शेट्टी यांचा शिरोळ व वाळवा तालुक्यावर भरवसा होता. शिरोळमध्ये झालेल्या मतांपैकी किमान १ लाख १० हजार मते मिळतील अशी अपेक्षा त्यांना होती. पण, त्यांच्या होमपिचवरच त्यांचा मोठा फटका बसला. वाळव्यानेही अपेक्षित साथ दिली नाही.

मानेंनी घेतली शेट्टींची मते

शेवटच्या टप्यात धैर्यशील माने यांनी लावलेल्या जोडण्यांमुळे सत्यजीत पाटील यांची मते ते कमी करणार, असे गणित राजू शेट्टी यांचे होते. मात्र, प्रत्यक्षात माने यांनी शेट्टी यांची मतेच घेतले.शेट्टींच्या पराभवाची प्रमुख कारणे..गेल्या पाच वर्षांत संघटनेतील सक्रीय कार्यकर्त्यांची कमी झालेली संख्याऊस दर आंदोलनाबद्दल शेतकऱ्यांच्या मनातच असलेली संभ्रमावस्थासंघटनेचे बळ कमी झाले असताना स्वबळाचा घेतलेला आत्मघातकी निर्णयजातीय राजकारणाचा झालेला प्रचार

शेट्टीच्या आतापर्यंतच्या निवडणूका..

२००९ - अपक्ष : मते - ४ लाख ८१ हजार २५ (९५ हजार ६० मतांनी विजयी)

२०१४- महायुती : मते - ६ लाख ३९ हजार १९१ (१ लाख ७७ हजार ८१० मतांनी विजयी)


२०१९ - महाविकास आघाडी - ४ लाख ८७ हजार २७६ ( ९५ हजार ७६८ मतांनी पराभव)

२०२४ - अपक्ष : मते - १ लाख ४० हजार ( सुमारे २ लाख ४५ हजारांनी पराभव)

# संपादकीय

## स्थित्यंतर

### मरणाच्या दारात ढकलणारे तापमान



राही भिडे
९८६७५२१०४९

जगभर होणाऱ्या हवामान बदलाचा जगावर विपरित परिणाम होत आहे. या वर्षी हिवाळा जाणवला नाही; पण उन्हाळ्यात सरासरी सात अंश सेल्सिअसने तापमान वाढले. उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण यंदा जास्त होते. जंगलतोड आणि सिमेंटची जंगले वाढत असल्यामुळे आपण विनाशाकडे चाललो आहोत, याची जाणीव आपल्याला या अंग भाजून काढणाऱ्या उन्हाळ्याने दिली आहे.

संपूर्ण आशियामध्ये या वेळी विक्रमी उष्णता आहे. 'वर्ल्ड वेदर ॲट्रिब्युशन ग्रुप'च्या एका नवीन अभ्यासात असे आढळून आले आहे, की हवामान बदलामुळे एप्रिल- मेमध्ये संपूर्ण आशियातील उष्णतेच्या लाटा वाढल्या होत्या. त्यामुळे अब्जावधी लोक प्रभावित झाले असून आशियातील अनेक प्रदेशांनी त्यांचे आतापर्यंतचे सर्वात उष्ण दिवस नोंदवले आहेत. म्यानमार, लाओस, व्हिएतनाम आणि फिलीपिन्समध्ये अभूतपूर्व उच्च तापमान दिसून आले. भारताच्या अनेक भागांमध्ये दुपारचे तापमान ४६-४८ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले, तर युद्धग्रस्त पॅलेस्टाईन आणि इस्रायललाही ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त उष्णतेचा सामना करावा लागला. दिल्ली, नागपूरच्या पायाने ५५ अंशाला स्पर्श केला. महाराष्ट्रात अनेक शहरांनी पन्नास अंशाला स्पर्श केला. साहजिकच हवामान बदलामुळे लोकांचे जगणे कठीण झाले आहे.

'जर्मन वॉच' ने जारी केलेल्या 'ग्लोबल क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार भारताला उष्णतेचा तडाखा बसत आहे. 'ग्लोबल क्लायमेट शिफ्ट इंडेक्स' नुसार, हवामानबदलामुळे मे महिन्यातील उष्णता सामान्य उष्णतेपेक्षा तीन ते सहा अंश सेल्सिअस जास्त असते. जर हवामान बदल झाला नसता, तर तापमान तीन ते सहा अंशांनी कमी झाले असते. 'युनायटेड नेशन्स इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज' (आयपीसीसी) आपल्या अहवालात वारंवार सांगत आहे, की जर हरितगृह वायू उत्सर्जन कमी केले नाही, तर ५० वर्षांच्या आत एक तृतीयांश मानवांना 'जवळजवळ असह्य 'उष्णतेचा फटका बसेल. काही वर्षांपूर्वी 'प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' या जर्नलमध्ये वर्तवण्यात आलेले भाकीत आता स्पष्टपणे वास्तवात येताना दिसत आहे. सातत्याने वाढणाऱ्या तापमानामुळे ३.५ अब्ज लोक मानवाला लाभलेल्या वातावरणापासून वंचित राहतील. जगाच्या लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकसंख्या असलेले भूभाग (आशिया) ग्लोबल वॉर्मिंगमुळे सहारा प्रदेशातील सर्वात उष्ण भागांसारखे उष्ण होत आहेत. संयुक्त राष्ट्राने नुकत्याच जाहीर केलेल्या अहवालानुसार, जगातील सर्व देशांनी त्यांच्या सध्याच्याउत्सर्जन-कपात प्रतिज्ञा (एनडीसी) पूर्ण केल्या तरी, या शतकात कधीतरी जगाला २.५ ते २.९ अंश तापमानवाढीचा सामना करावा लागेल.

मानवी क्रियाकलापांमुळे हवामान किमान मागील दोन हजार वर्षांपेक्षा जास्त उष्ण झाले आहे आणि मागील दशक हे सव्वा लाख वर्षांतील सर्वात उष्ण होते. पृथ्वीची उष्णता शोषून घेऊन, महासागरदेखील गरम झाले आहेत. विशेषतः हिंदी महासागराचे तापमान पूर्वीपेक्षा झपाट्याने वाढत आहे. सततच्या वाढीमुळे, त्याच्या पृष्ठभागाचे तापमान वर्षभर २८ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहण्याची अपेक्षा आहे. शास्त्रज्ञांनी असा इशारा दिला आहे, की पूर्वी हिंदी महासागरात दरवर्षी २० दिवस तीव्र उष्णता असायची; पण लवकरच हे प्रमाण दहापट वाढेल. आता दरवर्षी २२० ते २५० दिवस प्रचंड उष्मा असेल. साहजिकच जमिनीपासून ते समुद्रापर्यंत आपण प्रचंड उष्णतेचा तडाखा सहन करत आहोत. कडक उन्हाचा समाजातील प्रत्येक घटकावर आणि प्रत्येक सजीवाच्या जीवनावर वाईट परिणाम होत आहे. त्याचा परिणाम वेगवेगळ्या लोकांवर आणि प्राण्यांवर होत असला, तरी त्याचा सर्वाधिक फटका समाजातील गरीब आणि वंचित घटकांना बसतो. कडाक्याच्या उन्हात इलेक्शन ड्युटीसाठी जाणाऱ्या शिपाई आणि इतर कर्मचाऱ्यांना त्याचा फटका बसला. २२ लोकांना प्राण गमवावे लागले. पाटण्याच्या १८ विद्यार्थिनी बेशुद्ध पडल्या. जादा उष्ण हवामानाचागर्भवती महिलांवर वाईट परिणाम होतो. गर्भपाताचे प्रमाण वाढते. निवडणूक कामावर असलेल्या २१ सुरक्षा कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांसह ३० हून अधिक जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. निवडणूक आयोगाने निवडणूक घेताना आता सप्टेंबर ते फेब्रुवारीया महिन्यांच्या दरम्यान घेण्याचा विचार करायला हवा. राज्यकर्त्यांनीही तशी मानसिकता तयार करायला हवी. उत्तर भारतात तर उष्मा आता जीवघेणा बनला आहे. उष्णतेच्या लाटेने विक्रमी १६६ जणांचा बळी घेतला. आत्तापर्यंतच्या उपलब्ध आकडेवारीवर नजर टाकली, तर काशीमध्ये मे महिन्यात इतकी उष्णता कधीच नव्हती. १९५२ पासून वाराणसीतील हवामानाचे मूल्यांकन केले जात आहे. त्यानंतरच्या आकडेवारीवरून असे दिसून येते, की वाराणसीमध्ये इतके उच्च तापमान कधीच अनुभवले नव्हते.

बुंदेलखंड आणि मध्य उत्तर प्रदेशात उष्मा आणि लाटेमुळे ४७ जणांचा मृत्यू झाला. वाराणसी आणि आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्ये ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये सेक्टर मॅजिस्ट्रेट, हेड कॉन्स्टेबल, तीन रेल्वे कर्मचारी, होमगाई आणि अभियंता यांचाही समावेश आहे. प्रयागराजमध्ये ११, कौशांबीमध्ये नऊ, प्रतापगडमध्ये एक, गोरखपूरमध्ये एका मुलीसह तीन जणांचा मृत्यू झाला. झाशीमध्येही उष्माघातामुळे सहा जण आजारी पडून मृत्यूमुखी पडले. गाझियाबादमध्ये एका अर्भकासह चार, आग्रामध्ये तीन, रामपूर, लखीमपुर खेरी, पिलीभीत आणि शाहजहानपूरमध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला. जळगाव, अकोला जिल्ह्यात कधी नव्हे, ती उष्णतेसाठी जमावबंदी आदेश लागू करण्याची वेळ प्रशासनावर आली. दिल्लीतील तीन केंद्रांमध्ये तापमान ५० अंशापेक्षा जास्त झाले होते. राजस्थानमधील चुरू आणि फलोदी या शहरांमध्ये तापमान ५० अंशांवर पोहोचले आहे. हरियाणातील सिरसा येथेही तीच स्थिती आहे. सामान्यतः असे मानले जाते, की ज्या तापमानात मानव जगू शकतो ते कमाल तापमान ४२. ३ अंश सेल्सिअस आहे. उच्च तापमान शरीरातील प्रथिने नष्ट करू शकते. मेंदूला प्रचंड नुकसान होऊ शकते. मानवी शरीराला ४८-५० अंश सेल्सिअस तापमान सहन करणे कठीण आहे. ५० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात दीर्घकाळ राहिल्याने मेंदूचे गंभीर नुकसान होऊ शकते. चेतना नष्ट होऊ शकते. ४६ अंशाच्या पुढे मेंदूच्या पेशी मरायला लागतात, कारण प्रथिने मेंदूच्या पेशींमध्ये जमा होऊ लागतात. ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाचा मेंदूच्या विविध प्रकारच्या पेशींवर घातक परिणाम होतो. त्यामुळे या तापमानात बाहेर जाणे जीवघेणे ठरते. ज्यांना आधीच हृदयविकार आहे त्यांच्यासाठी जादा तापमान जास्त धोकादायक असू शकते.

# मत आणि मान गादीलाच ! छत्रपतींचा लखलखित विजय

**कोल्हापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, यांच्या कोल्हापुरात झालेल्या प्रचंड गर्दीच्या जाहीर प्रचारसभा, आठ दिवस तळ ठोकून बसलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांनी कमाल पातळीवर नेऊन ठेवलेली, आणि पणास लावलेली प्रतिष्ठा, ही एकूण प्रतिकूल पार्श्वभूमी असताना श्रीमंत शाहू छत्रपती यांनी कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून मिळवलेला विजय हा अधिक लखलखीत आहे असेच म्हणावे लागेल. लोकसभेवर निवडून जाण्याचे त्यांचे स्वप्न पहिल्याच प्रयत्नात प्रत्यक्षात उतरले आहे. त्यांच्या या लख्ख विजयाला अनेक घटकांचे हातभार लागलेले आहेत. विशेष म्हणजे काँग्रेस शिवाय ठाकरे आणि शरद पवार गटाची मते त्यांच्याकडे परावर्तित झाली असल्याने आगामी काळात विधानसभा निवडणुकीत राजकीय समीकरणे सुद्धा आता बदलणार आहेत.

देशाचे माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी हे कोल्हापूरच्या दौऱ्यावर आले असताना तेव्हा व्यासपीठावर असलेल्या श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांनी पहिल्यांदा काँग्रेसची सफेद टोपी घातली होती. तेव्हापासून जनतेतून निवडणूक लढवण्याचे त्यांचे स्वप्न होते. तर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडल्यानंतर शरद पवार यांनी कोल्हापुरातील ऐतिहासिक दसरा चौकात जाहीर सभा घेतली होती. आणि या सभेचे अध्यक्षस्थान श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी भूषवले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुद्धा त्यांना उमेदवारी देण्याची ठरवले होते. पण योग्य संधी त्यांना कधीही मिळाली नव्हती. मात्र या निवडणुकीत विशेष म्हणजे सुमारे ३५ वर्षानंतर काँग्रेसच्याच चिन्हावर निवडणूक लढवून ते पहिल्याच प्रयत्नात खासदार झाले आहेत.

मागील या सर्व घटनाक्रमानंतर महाराष्ट्रात मनोज जरांगे पाटील यांचा आरक्षण लढा सुरू झाल्यावर अंतरवाली सराटी या गावात जाऊन



श्रीमंत शाहू छत्रपती यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्या लढ्यास समर्थन दिले होते. या दोन घटनांवरून ते लोकसभा निवडणुकीत उतरणार असल्याचे संकेत मिळाले होते. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील जागा ही महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेल्या काँग्रेसला मिळाल्यामुळे श्रीमंत शाहू छत्रपती यांना काँग्रेसची उमेदवारी घ्यावी लागली. अन्यथा ते राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असते. हे एकमेव असे उमेदवार होते की त्यांना राजवाड्यावर जाऊन महाविकास आघाडीने उमेदवारी दिली होती.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे श्रीमंत शाहू छत्रपती विरुद्ध महायुतीचे संजय मंडलिक यांच्यातील लढत अटीतटीची होईल असे सुरुवातीपासूनचे वातावरण होते. पण त्यांनी मिळवलेले मताधिक्य पाहता त्यांचा हा मोठा विजय मानला जातो.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या कोल्हापूर उत्तर, कोल्हापूर दक्षिण, करवीर, राधानगरी भुदरगड, कागल आणि चंदगड या सहा विधानसभा मतदारसंघात श्रीमंत शाहू छत्रपती यांना मतदारांचे जोरदार समर्थन मिळाले आहे. संजय मंडलिक यांचा कागल हा घरचा मतदारसंघ

### जिकडे सतेज तिकडे विजय

**गत निवडणुकीत आमचे ठरलय अशी टॅगलाईन घेऊन आमदार सतेज पाटील यांनी संजय मंडलिक यांच्या पाठीमागे ताकद उभा केली होती .तर या निवडणुकीत श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या पाठीमागे आमचे ठरलय या टॅगलाईनची पुनरावृत्ती करत जिकडे सतेज तिकडे विजय हे परत एकदा दाखवून दिले आहे.**

तर पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचा बालेकिल्ला पण या मतदारसंघात सुद्धा श्रीमंत शाहू छत्रपतींना १ लाख १४ हजार २३, राधानगरी १ लाख ४६ हजार १०७ , कोल्हापूर उत्तर १ लाख ९४६, कोल्हापूर दक्षिण १ लाख २५ हजार ८७३, करवीर १ लाख ५६ हजार ७८० , चंदगड १ लाख ८ हजार ९५४ इतके मताधिक्य मिळाले आहे. यामध्ये सर्वात जास्त करवीर त्या पाठोपाठ राधानगरीने मताधिक्य दिले आहे.

भारतीय जनता पक्षाने उद्धव ठाकरे यांची मजबूत शिवसेना फोडल्यानंतर संजय मंडलिक हे ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले होते. त्यांचा हा निर्णय सर्वसामान्य मतदाराला रुचलेला दिसला नाही. याशिवाय त्यांच्याबद्दल या लोकसभा मतदारसंघात एक प्रकारचे नकारात्मक वातावरण निर्माण झाले होते.

पण त्यांना पुन्हा खासदार म्हणून निवडून आणण्याची जबाबदारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतःकडे घेतली होती. त्यासाठी प्रचार काळात शेवटच्या काही दिवस त्यांनी कोल्हापुरात मुक्कामच ठोकला होता. शिवाय त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच गृहमंत्री अमित शहा यांना प्रचारासाठी कोल्हापुरात आणले होते. पण संजय मंडलिक यांनी उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र केल्याचे लोकांना आवडले नाही. लोकांनी आपली नाराजी मतांच्या माध्यमातून व्यक्त केली आहे.

कोल्हापुरातील अल्पसंख्याक समाज अर्थात मुस्लिम समाज हा छत्रपती घराण्याला मानणारा आहे. मतदानाच्या दिवशी हा समाज मोठ्या उत्साहाने मतदान करण्यासाठी बाहेर पडला होता. या मतदारसंघातील दलित समाज तसेच ख्रिश्चन समाज हा श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या मागे ठामपणे उभा राहिला होता. जरांगे पाटील फॅक्टर अर्थात मराठा समाज, तसेच देशमुख, पाटील, जहागीरदार, इनामदार, सरदार, हा घटक अपेक्षेप्रमाणे छत्रपतींच्या समर्थनासाठी पुढे आला आहे हे मताच्या आकडेवारीवरून दिसून येते.

श्रीमंत शाहू छत्रपती यांना विजयाच्या मांडवाखाली आणण्यासाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आ. सतेज पाटील, करवीरचे आमदार पी .एन. पाटील यांनी जीवाचे रान केले होते. श्रीमंत शाहू छत्रपती यांचा विजय हा सतेज पाटील यांचा विजय असल्याचे मानले जाते. २०१९ च्या निवडणुकीत सतेज पाटील यांनी राजधर्म बाजूला ठेवून शिवसेनेचे संजय मंडलिक यांना अप्रत्यक्ष समर्थन देऊन निवडून आणले होते. आज त्याच संजय मंडलिक यांना पराभूत करण्यासाठी सतेज पाटील यांनी आपले राजकीय संघटन कौशल्य पणाला लावले होते. त्यांनी या निवडणुकीत दिलेली टॅगलाईन सत्यात आली आहे.

संजय मंडलिक यांच्या पाठीमागे भारतीय जनता पक्षासारखा बलाढ्य पक्ष होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या विजयासाठी देव पाण्यात घातले होते. पण तरीही कोल्हापूरच्या जनतेने कोल्हापूरच्या गादीला मानही दिला आणि मतही दिले. म्हणूनच मोठ्या फरकाने संजय मंडलिक यांचा या लोकसभा मतदारसंघात मोठ्या फरकाने पराभव झाला.



# देहूनगरपंचायत वतीने १७५ वृक्षांचे वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा

**पिंपरी चिंचवड :** श्रीक्षेत्र देहूच्या अवतीभवती नेहमी हिरवीगार झाडे सदा बहरलेली असावीत, देहूनगरपंचायतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी ५ जून रोजी शहरात १७५ देशी विदेशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले .देहूगावच्या गायरानातील एसटीपी प्लांट जवळ प्रमुखाच्या माध्यमातून ज्या त्या भागात पाच झाडांची वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.. शहरात शुद्ध हवा आणि ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्यासाठी वड, पिंपळ, चिंच, कडुनिंब, उंबर यांसारख्या देशी झाडांची लागवड करण्यात आली ,

जल, जमीन आणि जंगल हे पर्यावरणाचे कान, नाक आणि डोळे आहेत. यापैकी कोणत्याही घटकाला झालेली इजा पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड व मिथेन या वायूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यावरण ही आज जगासमोरील ज्वलंत समस्या बनली आहे. निसर्ग संपत्तीचा ऱ्हास, पर्यावरण ऱ्हास, महापूर, चक्रीवादळे, दुष्काळ, जंगलातील वनवे, समुद्राच्या पाण्याच्या पातळीतील होणारी वाढ, ऋतुचक्रातील बदल, विविध प्रकारची महामारी अशा भयानक संकटांनी अनेक वनस्पती, पशु-पक्षी यांच्या जाती नष्ट होत असून, त्याची भयानकता मानवाच्या अस्तित्वावरही घाला घालत आहे. असे प्रतिपादन देहू नगरपंचायत च्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे यांनी केले आहे

सुमारे पाच वर्षापूर्वी कोव्हीड-१९ चा विषाणूने अफाट बुद्धिमान, हुशार आणि शक्तिशाली असलेल्या मानवाला घरात बंदिस्त केले. रात्रंदिवस धावणाऱ्या जगाला कोरोनाने स्तब्ध करून ठेवले. या महामारीने समस्त जगासाठी एक स्पष्ट संदेश दिला आहे. तो मानवाने समजून घेऊन, आपल्या वृत्तीत आणि कृतीत सुधारणा करणे ही काळाची गरज आहे.या निसर्गाची 'इकोसिस्टीम' पुन्हा एकदा प्रस्थापित करण्याचा संकल्प करणे गरजेच आहे. त्याचाच एक भाग म्हणून देहू परिसरात देहू नगरपंचायतच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी संपूर्ण शहरात १७५ अधिक झाडांची लागवड केली, असे शहराध्यक्ष पुजा दिवटे यांनी सांगितले. शहरात विविध ठिकाणी झालेल्या या उपक्रमामध्ये सोसायटीधारक, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला तसेच राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

# भाजपतर्फे जागतिक पर्यावरण दिनी ७ हजार देशी झाडांचे रोपण

## शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या संकल्पनेतून पिंपरी चिंचवडमध्ये १४५० बुथप्रमुखांनी पाच झाडे घेतले दत्तक

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडकरांच्या अवतीभवती सदा वृक्षराजी बहरलेली असावीत, यासाठी पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या संकल्पनेतून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी ५ जून रोजी शहरात ७ हजार झाडे लावण्यात आले. पक्षाच्या प्रत्येक बुथ प्रमुखाच्या माध्यमातून त्या त्या भागात पाच झाडांची लागवड करून हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. शहरात शुद्ध हवा आणि ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्यासाठी वड, पिंपळ, चिंच, कडुनिंब, उंबर यांसारख्या देशी झाडांची लागवड करून ते झाडे बुथप्रमुखांनी दत्तक घेतले, अशी माहिती शंकर जगताप यांनी दिली.



जल, जमीन आणि जंगल हे पर्यावरणाचे कान, नाक आणि डोळे आहेत. यापैकी कोणत्याही घटकाला झालेली इजा पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड व मिथेन या वायूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यावरण ही आज जगासमोरील ज्वलंत समस्या बनली आहे. निसर्ग संपत्तीचा ऱ्हास, पर्यावरण ऱ्हास, महापूर, चक्रीवादळे, दुष्काळ, जंगलातील वनवे, समुद्राच्या पाण्याच्या पातळीतील होणारी वाढ, ऋतुचक्रातील बदल, विविध प्रकारची महामारी अशा भयानक संकटांनी अनेक वनस्पती, पशु-पक्षी यांच्या जाती नष्ट होत असून, त्याची भयानकता मानवाच्या अस्तित्वावरही घाला घालत आहे.

सुमारे पाच वर्षापूर्वी कोव्हीड-१९ चा विषाणूने अफाट बुद्धिमान, हुशार आणि शक्तिशाली असलेल्या मानवाला घरात बंदिस्त केले. रात्रंदिवस धावणाऱ्या जगाला कोरोनाने स्तब्ध करून ठेवले. या महामारीने समस्त जगासाठी एक स्पष्ट संदेश दिला आहे. तो मानवाने समजून घेऊन, आपल्या वृत्तीत आणि कृतीत सुधारणा करणे वर्तमानाची गरज व भविष्याची मागणी आहे. या निसर्गाची 'इकोसिस्टीम' पुन्हा एकदा प्रस्थापित करण्याचा संकल्प गरजेचा आहे. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी संपूर्ण शहरात ७ हजारहून अधिक झाडांची लागवड केली, असे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले. शहरात विविध ठिकाणी झालेल्या या उपक्रमामध्ये सोसायटीधारक, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला तसेच शहर भाजपाचे पदाधिकारी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

# भोरला रंगला खेळ पैठणीचा : किरण दगडे पाटील युवा मंचचे आयोजन

## रेश्मा अंकुश कांबळे ठरल्या होम मिनिस्टर व मानाच्या पैठणीच्या मानकरी

**भोर :** भोर शहरातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर किरण दगडे पाटील युवा मंच यांच्या वतीने शनिवार (दि.१) रोजी सायंकाळी पाच वाजता खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवत रेश्मा अंकुश कांबळे होम मिनिस्टर च्या मानाच्या पैठणीच्या मानकरी ठरल्या.

पुणे महानगरपालिका नगरसेवक किरण दगडे पाटील यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे, नगरसेवक किरण दगडे पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले.




भोर शहरासह तालुक्याच्या विविध भागातून सुमारे ५ हजाराहून अधिक महिला यावेळी उपस्थित होत्या.याप्रसंगी तालुक्यातील विविध क्षेत्रातील कर्तृत्व वान २० महिलांचा सन्मान मंत्री चंद्रकांत पाटील यांचे हस्ते करण्यात आला.

तर उपस्थित महिलांसाठी शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर प्रसिद्ध सिने अभिने ता क्रांतिनाना मळेगावकर आणि बालगायिका सह्याद्री मळेगावकर यांच्या सूत्रसंचालनाखाली न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी सैराट फेम प्रसिद्ध अभिनेता आकाश ठोसर आणि देवमाणूस फेम प्रसिद्ध अभिनेता किरण गायकवाड हे खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

या कार्यक्रमात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक (स्कुटी )जिंकून रेश्मा अंकुश कांबळे यांनी होम मिनिस्टरचा मान मिळवला.

दुसरा क्रमांक अक्षदा संपत गायकवाड (एल.इ.डी टीव्ही ),तिसरा क्रमांक पुष्पा गोविंद म्हेत्रे (रेफ्रिजरेटर),चतुर्य क्रमांक श्रद्धा संदीप कांबळे (पीठ गिरणी) ,पाचवा क्रमांक अश्विनी व्यकटेश शिंदे (शिलाई मशीन ) मिळवला. तर नगरसेवक किरण दगडे पाटील, बावधन ग्रामपंचायत सरपंच पियुषा किरण दगडे पाटील यांच्या हस्ते शंभरहून अधिक महिलांना पैठणी साडी तसेच सहभागी सर्व महिलांना बक्षीस देवून गौरविण्यात आले.

याप्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष जीवन कोंडे,जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब गरुड,युवा नेते राहुल दगडे पाटील, वेल्हे तालूका अध्यक्ष आनंद देशमाने, अप्पासाहेब चोंधे, युवा मोर्चा अध्यक्ष अमर बुदगुडे, शहराध्यक्ष सचिनजी कण्हेरकर, शहर राष्ट्रवादी अध्यक्ष केदार देशपांडे,आशा शिवतरे,अतुल काकडे,सोमनाथ ढवळे,भोलावडेचे सरपंच प्रवीण जगदाळे, कुणाल धुमाळ, शुभम पासलकर,राजाभाऊ रेणुसे, स्वाती गांधी,दत्तात्रय नवघणे ,लता बांदल, रोहन भोसले, सुशांत लोखंडे, समाधान पारठे तसेच किरण दगडे पाटील युवा मंचचे सर्व कार्यकर्ते ,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# फडणवीसांची राजीनाम्याची तयारी !

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारत भाजपचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शविली आहे. पक्षाचं काम करण्यासाठी मला उपमुख्यमंत्री पदावरून मुक्त करण्यात यावं अशी विनंती वरिष्ठांकडे करणार असल्याचे फडणवीस म्हणाले. मुंबईत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारली. देवेंद्र फडणवीस यांच्या या घोषणेमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

राज्यात ४५ पेक्षा जास्त जागा मिळवण्याची भाषा करणाऱ्या भाजपप्रणित महायुतीला लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसला आहे. महायुतीला अवघ्या १७ जागा मिळाल्या. तर गेल्या निवडणुकीत २३ खासदार निवडून आणणाऱ्या भाजपची ९ जागांपर्यंत घसरण झाली. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत थेट उपमुख्यमंत्रीपद सोडून पक्षसंघटनेसाठी पूर्णवेळ काम करण्याची इच्छा बोलून दाखवली. मला विधानसभेसाठी पूर्ण उतरायचं आहे, मला सरकारमधून मोकळं करावे अशी विनंती मी नेतृत्त्वाकडे करणार आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. भाजपच्या कार्यकर्त्यांनी उत्तम काम केलेलं आहे. मुंबईच्या अध्यक्षांनी स्वतः लक्ष घातलं. जो पराभव झाला त्याची सर्व जबाबदारी माझी आहे. सर्व जबाबदारी देवेंद्र फडणवीस स्वीकारत आहे. दरम्यान फडणवीस यांच्या घोषणेनंतर त्यांच्या मनधरणीसाठी भाजपचे नेते आणि मंत्रयांची सागर बंगल्यावर धाव घेतली होती.

बावनकुळे म्हणाले, आम्ही सगळेच जबाबदार !

भाजपचे प्रदेश अध्यक्ष



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या पराजयाला केवळ ते एकटेच जबाबदार नाही. तर आम्ही सगळेच जबाबदार आहोत. परंतु त्यांनी सरकारमधून बाहेर जाण्याची काही एक गरज नाही. त्यांनी सरकारमध्ये राहून आम्हाला पक्षसंघटनेसाठी मार्गदर्शन करावे, अशी विनंती भाजपच्या कोअर कमिटीने फडणवीस यांना केल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

# निकालानंतर आरोप-पत्यारोप सुरू

**अकोला :** लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता आरोप-पत्यारोप सुरू झाले आहेत. काँग्रेसचेउमेदवार डॉ. अभय पाटील यांनी माध्यमांसोबत बोलताना वंचित बहुजन आघाडीचे ड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकारणकाँग्रेसलापाडण्यासाठी व भाजपला मदत करण्यासाठी असल्याचा आरोप केला आहे. त्यावर वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी डॉ. अभय पाटील यांना प्रत्युत्तर देताना काँग्रेसने गेल्या दोन निवडणुकीत काय केले होते, याची आठवण करून देत इतिसाहात डोकावून बघण्याचा सल्ला दिला आहे.अकोलालोकसभा मतदारसंघात काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांच्यात झालेल्या मतविभाजनामुळे भाजपचा विजय झाल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. काँग्रेसला ४० हजार मतांनी निसटता पराभव पत्करावा लागला. याबाबत माध्यमांशी बोलताना डॉ. पाटील यांनी आंबेडकर यांची भूमिका भाजपला पूरक असल्याचा आरोप केला. त्यावर वंचितचे पातोडे यांनी निवडणूक काळात केलेली टीका ही राजकीय स्वरुपाची होती. जनतेसमोर वस्तूस्थिती मांडण्याच्या दृष्टीने केलेली ती टीका होती. त्यामुळे पाटील यांनी केलेल्या आरोपात तथ्य नाही. यापूर्वीच्या दोन निवडणुकांमध्ये काँग्रेसने बाळासाहेबांचा पराभव व्हावा या उद्देशानेच उमेदवार दिला होता, हे पाटील यांनी विसरू नये.

# पुणे शहराच्या वतीने खासदार मुरलीधर मोहोळ यांचा सत्कार



**हडपसर / पुणे :** पुणे शहराचे भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालय जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भारतीय जनता पार्टी व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) महायुतीचे पुणे शहराचे नवनिर्वाचित खासदार मुरलीधर मोहोळ यांचा सत्कार रिपाइंच्या वतीने करण्यात आला.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी पेढे वाटप करून आनंद उत्सव साजरा केला..

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे. पुणे शहर प्रभारी शैलेंद्र चव्हाण. रिपाइं महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब जानराव. रिपाइं पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष विशाल शेवाळे. माजी उपमहापौर डॉ सिद्धार्थ धेंडे. माजी उपमहापौर सुनितताताई वाडेकर. माजी नगरसेविका हिमाली कांबळे. बाबुराव घाडगे. मोहन जगताप. पुणे शहर कार्याध्यक्ष वसंतराव बनसोडे. माजी नगरसेवक जयदेव रणदिवे. महिपाल वाघमारे. सरचिटणीस शाम सदाफुले. दादा बारभुवन. भगवान गायकवाड. मोहन जगताप. रमेश तेलावडे. अतुल भालेराव. शांतिनाथ चव्हाण. संदीप धांडोरे. वैभव पवार. मंगला रासगे. नसीम शेख. सुनबी शेख. अक्षय अवसरमल सह रिपाइं कार्यकर्ते उपस्थित हो

# पृथ्वीराज चव्हाणांसाठी धोक्याची घंटा

## 'कराड दक्षिण'ची सेमी फायनल अतुल भोसलेंनी जिंकली

**कराड :** नुकतीच झालेली लोकसभा निवडणूक म्हणजे येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची सेमी फायनल म्हणून पाहिली जात होती. त्यामुळे या निवडणुकीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात प्रत्येकानेच प्रतिष्ठा पणाला लावत काम केले होते. कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघही त्याला अपवाद नाही. पण काँग्रेस विचारांचा मतदारसंघ म्हणून ओळख असलेल्या या मतदारसंघात प्रथमच भाजपने मताधिक्य घेतल्याने डॉ.अतुल भोसलेयांनी विधानसभेची सेमी फायनल जिंकली अशीच चर्चा सुरू झाली आहे.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघ हा यशवंत विचारांचा किंवा काँग्रेस विचारांचा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. आजवर जिल्ह्यात राष्ट्रवादी आणि भाजपची लाट आली तरी या मतदारसंघाने काँग्रेसचाच आमदार निवडून दिला आहे. आजवर येथून दिवंगत यशवंतराव मोहिते, विलासराव पाटील -उंडाळकर यांनी नेतृत्व केले. तर सध्या काँग्रेसचे नेते, माजी मुख्यमंत्रीपृथ्वीराज चव्हाणनेतृत्व करीत आहेत.





भाजपचे नेते डॉ.अतुल भोसलेयांनी यापूर्वी २ वेळा कराड दक्षिणमधून नशीब आजमावले. पण त्यावेळी त्यांना यश आले नाही. मात्र त्यांनी आपली चिकाटी सोडलेली नाही .कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांनी सातत्याने विकास कामे व समाजकार्याचा धडाका सुरू ठेवला आहे. नुकतीच झालेली लोकसभेची निवडणूक त्यांनी विधानसभेची सेमी फायनल म्हणूनच लढली. त्यासाठी अथक परिश्रम घेतले. आणि त्याचेच फलित म्हणून यावेळी ६१६ मतांचे मताधिक्य भाजपचे उमेदवारउदयनराजे भोसलेयांना दिले गेले आहे. या मतांनीउदयनराजे भोसलेयांच्या विजयाला हातभार लावला आहेच पण उद्याच्या विधानसभा निवडणुकीच्या मार्गावर त्यांनी यशाची बिजे रोवली आहेत असंच म्हटलं तरी वागत ठरणार नाही.मताधिक्य चर्चेचा विषयगत लोकसभा निवडणुकीत कराड दक्षिण मतदार संघातून राष्ट्रवादीचे तत्कालीन उमेदवार खासदार श्रीनिवास पाटील यांना सुमारे ३१ हजारांचे मताधिक्य दिले होते. यावेळी कराडचा उमेदवार नसल्याने हे मताधिक्य कमी होईल असा अनेकांचा कयास होता. पण कराड दक्षिणेत भाजप मताधिक्य घेईल असं कोणीही म्हटण्याचं धाडस करत नव्हते. पण डॉ. अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ६१६ मतांची घेतलेले मताधिक्य सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.त्यांच्यावर आत्मचिंतनाची वेळकराड दक्षिण हा काँग्रेस विचारांचा मतदारसंघ मानला जातो. येथे काँग्रेस अंतर्गत असणारे दोन परस्परविरोधी गट सर्वश्रुत होते. मात्र अलीकडच्या काही वर्षात हे दोन गट एकत्रित आले आहेत. स्थानिक शिखर संस्थांच्या निवडणुकीत आमदारपृथ्वीराज चव्हाणव अँड. उदयसिंह पाटील यांनी एकीचे बळही दाखवून दिले आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेस दक्षिणेत मताधिक्य घेणारच फक्त किती? एवढीच चर्चा होत होती. पण प्रत्यक्षात काँग्रेसची झालेली पिछाडी नेत्यांसह कार्यकर्त्यांना आत्मचिंतन करायला लावणारी आहे.लोकसभा निवडणुकीसाठी कराड दक्षिण मतदार संघात ३ लाख ३ हजार ८८० एवढे मतदार होते. पैकी १ लाख ९७ हजार ६९५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजे सुमारे ६५.२७ टक्के मतदान झाले होते. प्रत्यक्षात भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांना ९२ हजार ८१४ तर राष्ट्रवादीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांना ९२ हजार १९८ एवढी मते मिळाली. तर इतर उमेदवारांना मिळून १३ हजार ६१४ मते मिळाली.

यात उदयनराजे भोसले यांना ६१६ मतांचे मताधिक्य मिळाल्याचे स्पष्ट होते.यापूर्वी नगरपालिकेत फुलले होते कमळ !खरंतर कराड च्या मातीत यापूर्वी एकदा कमळ फुलले होते. तेही नगरपालिकेच्या निवडणुकीत. सन २०१६ मध्ये झालेल्या थेट नगराध्यक्षा पदाच्या निवडणुकीत भाजपच्या रोहिणी शिंदे यांनी तिरंगी लढतीत बाजी मारत विजय संपादन केला होता. त्यानंतर आता कराड दक्षिणेत लोकसभा निवडणुकीच्या मतदानात मताधिक्य मिळालेले आहे.

# देशात परिवर्तनाला पोषक वातावरण: शरद पवार

**मुंबई:** देशभरात परिवर्तनाला पोषक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र मतमोजणीच्या कलावरून स्पष्ट झाले आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस कार्यक्षम पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचार मोहिमेदरम्यान ४०० पारचा नारा लागणाऱ्या भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला तीनशे पर्यंत जागांवरही अद्याप आघाडी मिळवता आलेली नाही. मात्र, इंडिया गाडीचे उमेदवार अपेक्षेपेक्षा अधिक जागांवर आघाडीवर दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे सूचित केले आहे.

मतमोजणीचा कल स्पष्ट झाल्यानंतर आपण काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय नेते सीताराम येचुरी अशा काही मोजक्या नेत्यांची चर्चा केली आहे. मात्र, सत्ता स्थापनेच्या दृष्टीने सध्या इंडिया



आघाडीत नसलेल्या नितीश कुमार किंवा चंद्राबाबू नायडू यांच्याशी आपण अद्याप संपर्क साधलेला नाही. त्याबाबतचा निर्णय इंडिया गाडीच्या बैठकीनंतर घेण्यात येईल. आगामी दिशा ठरवण्यासाठी उद्या दिल्ली येथे इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या नेत्यांची बैठक आयोजित करण्यात येणार आहे. आपण त्या बैठकीला आवर्जून उपस्थित राहणार आहोत, असेही पवार यांनी सांगितले.

महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा स्ट्राईक रेट चांगला राहिला आहे. पक्षाने लढविलेल्या १० जागांपैकी सात जागांवर आमचे उमेदवार आघाडीवर आहेत. हे श्रेय एकट्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नाही. काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनीही आमच्याबरोबर एकजुटीने आणि एक दिलाने काम केले. त्यामुळे हा विजय महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांचा आहे, असेही पवार यांनी नमूद केले.

# मोदी यांना सत्तेपासून रोखण्यासाठी पवार सरसावले

**नवी दिल्ली** : भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा विजयी वारू रोखण्यात इंडिया आघाडीला बऱ्यापैकी यश मिळत असल्याचे चित्र स्पष्ट होताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख आणि इंडिया आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेपासून दूर करण्यासाठी सरसावले आहेत. इंडिया गाडीला सत्ता स्थापनेसाठी मदत मिळावी म्हणून त्यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि तेलगू देशमचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांच्याशी संपर्क साधला आहे.

लोकसभा निवडणुकीपूर्वी या देशात विरोधी पक्ष अस्तित्वात नाही. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी होणार, अशी हवा भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आली होती. प्रत्यक्षात या निवडणुकीत विरोधकांची इंडिया आघाडी आणि सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्या खासदार संख्येत अपेक्षेपेक्षा खूपच कमी अंतर राहण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे केंद्रात सत्ता स्थापन करण्याच्या आशा इंडिया आघाडीमध्ये पल्लवी झाल्या आहेत. त्या दृष्टीने विशेषतः छोट्या प्रादेशिक पक्षांना जवळ करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.





इंडिया आघाडीत वयाने आणि अनुभवाने ज्येष्ठ असलेले शरद पवार यांच्यावर इंडिया आघाडीला सत्ता स्थापनेसाठी पाठिंबा मिळावा म्हणून विविध पक्षांना एकत्र करण्याची जबाबदारी दिली असल्याचे दिसून येत आहे. त्या दृष्टीनेच पवार यांनी आंध्र प्रदेशात उल्लेखनीय यश मिळवलेले चंद्राबाबू नायडू आणि इंडिया आघाडीच्या स्थापनेत सुरुवातीच्या काळात पुढाकार घेतलेले मात्र, नंतरच्या काळात भाजपच्या गोटात सामील झालेले नितीश कुमार यांच्याशी पवार यांनी संपर्क साधला आहे.

पवार हे दीर्घकाळ राज्याच्या आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात सक्रिय आहेत. अनेक पक्षातील नेत्यांचे पवार यांच्याशी सलोख्याचे संबंध आहेत. कूटनीतीचा वापर करून राजकारणात अशक्य वाटणारी समीकरणे जुळवून आणण्यात पवार यांचा हातखंडा आहे. महाराष्ट्रात स्पष्ट बहुमत मिळालेल्या युतीतून शिवसेनेला बाहेर काढून त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसवले आणि महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले. त्याच धर्तीवर देशपातळीवर राजकीय समीकरण जुळवून मोदी यांना सत्तेपासून दूर ठेवण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले आहेत.



# सातारा जिल्ह्यात मान्सून पूर्व पाऊस ; रानात पाणी साठले !

**सातारा :** जिल्ह्यात मान्सून पूर्वपाऊसहोत असून बुधवारी अनेक भागात मेघगर्जनेसह हजेरी लावली. साताऱ्यातही रिमझिम तर माण तालुक्यात अनेक ठिकाणी दमदारपाऊसझाला. यामुळे शेतजमिनीत पाणी साचले. तसेच फलटण तालुक्यातही पावसाने हजेरी लावली. दरम्यान, कोयना धरण आणि नवजा येथेही पावसाची नोंद झाली आहे.

जिल्ह्यात यावर्षी वळवाचा पाऊस झाला. पण, या पावसात जोर नव्हता. त्यामुळे ओढे-नद्यांना पाणी वाहिले नाही. फक्त वातावरणातील दाहकता कमी झाली. तरीही यंदा वळवाचे पाऊस कमीच झाले. तर मागील चार दिवसांपासून जिल्ह्यात थंडगार वारे वाहत होते. तसेच पाराही कमी झाला होता. यामुळे मान्सूनपूर्व पाऊस होण्याची चिन्हे होती. या अंदाजाप्रमाणे बुधवारपासून जिल्ह्यात मान्सून पूर्व पाऊस पडू लागला आहे. दिवसभरात अनेक ठिकाणी हजेरी लावली.-ऊ्तएठढखडएचएछढ्झुेशीशव लूसातारा शहरात सकाळपासून ढगाळ वातावरण तयार झाले होते. दुपारी एकच्या सुमारास ढगांच्या गडगडाट सुरू झाला. तसेच रिमझिम पावसाला सुरुवात झाली. त्यानंतरही सायंकाळी उशिरापर्यंत ढगाळ वातावरण कायम होते. तर सातारा तालुक्यातही अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. तर सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात लवकरच पाऊस सुरू होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

माण तालुक्याच्या काही भागातही पाऊस पडला. पूर्व तसेच पश्चिम भागात पावसाने हजेरी लावली. यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. तर या पावसामुळे काही गावातील शेत जमिनीत पाणी साचले. तरीही खरीप हंगामाच्यादृष्टीने मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. आता झालेल्या पावसाने काही भागात पेरणी पूर्व मशागतीची कामे मार्गी लागतील. पण, अनेक ठिकाणी मशागतीसाठी पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

तरीही सध्या मान्सून पूर्व पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांत आशेचे वातावरण तयार झालेले आहे. त्याचबरोबर फलटण शहरासह तालुक्यातही मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावली. शहरात जोरदार पाऊस झाला. यामुळे रस्त्यावरुन पाण्याचे लोट वाहिले.

# साताऱ्यात तेराव्या फेरीनंतर श्री. छ .खा उदयनराजेंना सापडला विजयाचा मार्ग...

**सातारा :** संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या ४५- सातारा लोकसभा मतदारसंघात १६ उमेदवार होते. त्यापैकी महायुती व महाविकास आघाडी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट पुरस्कृत उमेदवार अशा तीन उमेदवारांमध्ये चांगली लढत झाली यामध्ये तेराव्या मतमोजणी फेरीनंतर महायुतीचे उमेदवार श्री छ उदयनराजे भोसले यांना विजयाचा मार्ग सापडला त्यांना एकूण पाच लाख ७१ हजार १३४ तर त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार श्री शशिकांत शिंदे यांना पाच लाख ३८ हजार३६३ तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे पुरस्कृत संजय गाडे यांना ३७ हजार ६२ मते मिळाली. यामध्ये उमेदवार पसंत नसलेल्या नोटासाठी ५६२२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला एकूणच या अटीतटीच्या निवडणुकीत श्री छ खा भोसले यांचा ३२ हजार७७१ मताने विजयी झाल्याची घोषणा सायंकाळी करण्यात आली.

तसेच त्यांना सातारा जिल्हा अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री जितेंद्र दुडी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. सातारा येथील औद्योगिक वसाहती मधील शासकीय गोदाम या ठिकाणी सातारा लोकसभा मतदारसंघासाठी स्वातंत्ररित्या सहा विधानसभा मतदार संघाची मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरू करण्यात आली.

सुरुवातीला उमेदवारांचे प्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये सर्व ईव्हीएम यंत्रणा आणण्यात आल्या. यासाठी वेगवेगळे पद्धतीने कोतवाल यांना ड्रेस कोड देण्यात आले होते. तसेच सर्व ईव्हीएम यंत्रणेसाठी विशेष कॅमेरा व निवडणूक



अधिकाऱ्यांसोबतच वरिष्ठ अधिकारी कर्मचारी यांनी मतमोजणीला सुरुवात केली

आठ वाजून ४५ मिनिटांनी पहिल्या फेरीचे मतमोजणी पूर्ण होऊन सुरुवातीलाच महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी आघाडी घेतली. ही आघाडी थेट तेरा फेरीपर्यंत कायम राहिल्यामुळे सातारा शहर व परिसरात शांततेचे वातावरण होते एवढेच नव्हे तर अनेक प्रसारमाध्यमचे प्रतिनिधी यांनी सुद्धा या मतमोजणी केंद्रामधील प्रिंट व मीडिया कक्षेमध्ये उत्सुकता ताणली गेली होती.

त्यानंतर तेराव्या फेरीमध्ये सातारा जावली विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणीला सुरुवात होताच महायुतीचे उमेदवार श्री छ खा भोसले यांना अपेक्षितरित्या मतमोजणी मध्ये आघाडी मिळाली. आणि सातारा शहरातील रस्ते गर्दीने फुलून जाण्यास सुरुवात झाली.

ही आघाडी २३ व्या फेरीपर्यंत कायम राहिली. मतमोजणीच्या दिवशी दुपारी साताऱ्यातशांतता व रस्त्यावर तुरळक गर्दी असताना अचानक श्री छ खा भोसले यांच्या विजयाची नांदी लागली .अनेक हौसे- नवसे- गवसे यांनी रस्त्यावर येऊन आनंद उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

सातारा शहर परिसरात १४४ कलम व जमावबंदीचा आदेश तसेच वाद्य वाजवण्यास परवानगी नसतानाही मोठ्या प्रमाणात डी.जे व रस्त्यावर जे.सी.बी. आणून शिवतीर्थावर मोठी गर्दी झाली होती .या गर्दीला नियंत्रण करणे वाहतूक पोलीस व सातारा पोलिसांना अक्षरशा अपयश आले होते. याबाबत श्री छ खा उदयनराजे भोसले यांचे कट्टर समर्थक माजी आमदार डॉक्टर दिलीप येळगावकर यांनी सुद्धा या विजयाबद्दल आनंद उत्सव साजरा केला. साताऱ्यातील झालेल्या गर्दी बाबत त्यांना विचारणा केली असता एवढ्या मोठ्या प्रमाणात जर गर्दी झाली असेल व त्यांनी जर मतदान केले असेल तर एक लाख मताधिक्याने उदयनराजे निवडून आले पाहिजे होते असे त्यांनी ठामपणे सांगितले.

शेवटी विजयला अनेक वाटा असतात. पण पराभवाला एकच वाट असते महाविकास आघाडीचे उमेदवार व प्रचारक यांनी चांगल्या पद्धतीने लढत दिली आहे. या स्मरणीय लढतीमुळे खऱ्या अर्थाने सातारा लोकसभा मतदारसंघाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले आहे. जय पराजय अपेक्षा साताऱ्यातील निवडणूक ही चांगलीच गाजली. महायुतीच्या चार आमदारांनी प्रामाणिकपणाने समर्थकांसोबत काम केल्यामुळे श्री छ खा भोसले यांचा मार्ग तेराव्या फेरीत सुरू झाला. त्यामुळे आमदार व त्यांच्या समर्थकांनी सुद्धा आनंदात सहभागी होण्यास सुरुवात केली. सातारा येथील या निवडणुकीचे खास वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीला महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांना मतमोजणी मध्ये आघाडी मिळाल्यामुळे अति उत्साही कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी व गुलालाची उधळण करत आनंद उत्सव साजरा केला तर सायंकाळी विजयी उमेदवार श्री छ खा भोसले यांच्या समर्थकांनी रस्त्यावर येऊन मोठा जल्लोष केला विशेष म्हणजे महाराष्ट्रात प्रथमच जय पराजय झालेल्या उमेदवारांचा जल्लोष पाहून नेमकं काय घडले हे पाहण्यासाठी अनेकजण संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होता मीडिया कक्षेमध्ये देशभरातील निकाल पहिल्या फेरीपासून समजत होते परंतु सातारा लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी व त्याची माहिती लवकर मिळत नसल्याने अनेक जण आपापल्या सहकाऱ्यांना संपर्क साधून विचारणा करत होते अखेर सायंकाळी या निवडणुकीचे सर्व मतमोजणी पूर्ण झाली आणि कोणताही अनुचित प्रकरण घडल्यामुळे पोलीस यंत्रणेचा ही ताण कमी झाला. सदरची निवडणूक ही चांगलीच गाजली असली तरी याबाबतचे आता अनेकजण विश्लेषण करतील पण खऱ्या अर्थाने तिसऱ्या तिसऱ्या उमेदवाराची तुतारी ही या विजयाची शिल्पकार ठरल्याची ही चर्चा सुरू झालेली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे उमेदवार श्री संजय कोंडीबा गाडे यांच्यासह अनेक उमेदवारांना मते मिळाले असली तरी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत कदम यांना अवघी ११,९१२ मते मिळाल्यामुळे वंचितचा करिष्मा दिसून आला नाही. हे सुद्धा स्पष्ट झाले आहे.



## धैर्यशील मोहिते-पाटीलांच्या विजयानंतर टेंभुर्णीत जल्लोष

**टेंभुर्णी :** राज्यामध्ये प्रतिष्ठेचा असलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मताधिक्य घेताच टेंभुर्णी शहरातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन गुलालाची ओझं करीत फटाक्यांची आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात जल्लोष साजरा केला.

यावेळी माजी सरपंच प्रमोद कुटे काँग्रेस कमीटीचे माजी तालुकाध्यक्ष ऋषिकेश बोबडे,शिवसेनेचे शहरप्रमुख सुरेश लोंढे,उपप्रमुख प्रशांत सोमवणे,विनोद पाटील,विकास धोत्रे,महेश कोठारी,अकाश लोंढे,अकाश पाटील,विजय कोकाटे,यांचेसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## देशात केंद्रीय जीएसटी विभागात ४५ टक्के पदे रिक्त

नागपूर: देशात केंद्रीय वस्तू व सेवा कराचे (सीजीएसटी) संकलन मोठ्या प्रमाणात वाढले असतानाच दिवसेंदिवस वाढत असलेल्या रिक्त पदांमुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरकामांचा अतिरिक्त ताण वाढला आहे. कामाच्या व्यवस्थित नियोजनासाठी प्रत्येक विभागात रिक्त पदे भरण्याची अधिकारी आणि कर्मचारी असोसिएशनची मागणी आहे.

देशात सीजीएसटी आणि सीमा शुल्क विभागात ४५ टक्के पदे रिक्त असल्याची माहिती आहे. या संदर्भातील डाटा केंद्रीय अप्रत्यक्ष कर बोर्डाने वेबसाइटवर प्रकाशित केला आहे. आकडेवारीनुसार संपूर्ण देशात केंद्रीय जीएसटी व सीमा शुल्क विभागात १ जुलै २०२३ पर्यंत ९१,७४० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५०,६५९ पदांवर कर्मचारी कार्यरत आणि ४१,०८१ पदे रिक्त (४५ टक्के) आहेत. त्यात दरवर्षी वाढ होत आहे.

## साताराच्या समाज कल्याण अधिकारी महिलेस लाखाची लाच घेताना अटक

**सांगली :** शैक्षणिक संस्थेस मंजूर अनुदानासाठी पाच लाख रूपये लाचेची मागणी करून एक लाखाची लाच घेताना समाज कल्याणच्या अतिरिक्त सहायक संचालक तथा सातारा जि.प. समाज कल्याण अधिकारी सपना सुखदेव घोळवे (वय ४०) यांना सांगलीत अटक केली. तसेच समाज कल्याण निरीक्षक दिपक भगवान पाटील (वय ३६) याने आश्रम शाळेच्या अनुदानाच्या धनादेशासाठी दहा हजार रूपयाची मागणी केल्याबद्दल त्यालाही अटक केली. समाज कल्याण विभागातील लाचखोरांवरील कारवाईच्या डबल धमाक्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे.

अधिक माहिती अशी, तक्रारदार यांची एक शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेस शासनामार्फत भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमातील नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्यासाठी ५९ लाख ४० हजार रूपये अनुदान मंजूर झाले आहे. या अनुदानाचा पहिला हप्ता २९ लाख ७० हजार रूपये शाळेला दिला आहे. पहिला हप्ता दिल्याचा मोबदला म्हणून दहा टक्के व दुसरा हप्ता देण्यासाठी दहा टक्के रक्कम मिळून सहा लाख रूपये लाचेची मागणी घोळवे यांनी केली. त्यांच्याकडे सांगलीत इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार आहे.

लाचेची मागणी केल्यानंतर तक्रारदार संस्थेच्या पदाधिकारी यांनी ५ जून रोजी तक्रार केली. तक्रारीची पडताळणी केली. त्यामध्ये घोळवे यांनी सहा लाख रूपये लाच मागितली. चर्चेअंती पाच लाख रूपये व त्यानंतर अडीच लाख रूपये लाचेची मागणी करत पहिला हप्ता एक लाख रूपये लगेच घेऊन येण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तत्काळ सामाजिक न्याय भवनमधील इतर मागास बहुजन कल्याण विभागात सापळा रचला. तक्रारदार यांच्याकडून एक लाख रूपये लाच घेताना घोळवे यांना रंगेहाथ पकडले. तर याच कार्यालयातील समाज कल्याण निरीक्षक दिपक पाटील याने तक्रारदाराकडे आश्रम शाळेच्या अनुदानाचा धनादेश दिल्याचा मोबदला म्हणून दहा हजार लाचेची मागणी केल्याबद्दल अटक केली.

## सातारा लोकसभा जिंकल्याचा भाजपा जिल्हा कार्यालयात जल्लोष

**सातारा** लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रथमच भाजपने विजय मिळवला. आजपर्यंत च्या इतिहासात पहिल्यांदाच साताऱ्यात कमळ फुलले , या विजयाचा जल्लोष सातारा लोकसभेत अनेक ठिकाणी करण्यात आला भारतीय जनता पार्टी सातारा जिल्हा कार्यालयात सुद्धा हा आनंद मोठ्या प्रमाणावर साजरा केला गेला. ७५ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर प्रथमच सातारा मतदारसंघात उदयनराजेंनी भाजपाचे कमळ फुलवले. या यशामध्ये सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी काम करून हातभार लावला , जिल्हा कार्यालयात विजयाचा गुलाल उधळून आणि पेढे वाटून आनंद साजरा केला. या मतदारसंघात ग्रामपंचायती, पंचायत समिती जिल्हा परिषद



नगरपालिका या ठिकाणी यश मिळाले तरीही कधीही भाजपला खासदारकीच्या निवडणुकीत साथ दिलेली नव्हती. या वेळी ही ओळख पुसण्यामध्ये भाजपला यश आले आहे.

श्री. छ. उदयनराजे भोसले यांनी या मतदारसंघातून एक हाती विजय मिळवून सातारा मतदारसंघात प्रथमच भाजपचे कमळ फुलवले. या विजयासाठी सातारा लोकसभेतील नेत्यांनी कार्यकर्त्यांनी मोठा हातभार लावला आहे. यामुळे त्यांच्या विजयाचा जल्लोष मोठ्या प्रमाणात साजरा केला गेला. लाडू वाटून आणि गुलाल उधळून प्रचंड मोठ्या प्रमाणात आनंद साजरा करण्यात

भाजपा सातारा जिल्हा कार्यालयात हा विजय साजरा करण्यासाठी सातारा जावळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्रीमती छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले , सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम राजूभैय्या भोसले फिरोज पठाण उपस्थित होते

जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांनी श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे स्वागत केले आणि विजयाचा गुलाल लावला आणि लाडू भरवला. त्यावेळी बोलताना श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विजयाचे श्रेय सर्व कार्यकर्त्यांना दिले आणि इथून पुढेही सर्वांनी एकत्र राहून काम करावे आणि सातारा जिल्हा भाजपचा बालेकिल्ला आहे हे सिद्ध करावे असे आवाहन केले

या वेळी करण्यात आलेली फटाक्यांची आतषबाजी अनेकांचे लक्ष वेधून घेत होती. गुलालामध्ये न्हालेले कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उदयनराजे आणि भाजप विजयाच्या घोषणा देत होते.

## अमोल कोल्हे यांचा विजय गुलाल उधळून जल्लोष साजरा

**वळती ( वा ) :** शिरूर लोकसभेच्या निवडणूकीत डॉ. अमोल कोल्हे यांचा विजय झाल्याने आंबेगांव तालुक्यात कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून एकच जल्लोश साजरा केला.

शिरूर लोकसभेच्या अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीत कार्यकर्त्यांमध्ये निकालाची उत्कंठा शिगेला पोहोचली होती .मतदारांनी या निवडणुकीत मतदान केल्यापासून ते आज निकालापर्यंत गावातील पारावर गप्पा रंगत होत्या .राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून डॉ.अमोल कोल्हे तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात चुरशीची लढत झाली .यामध्ये विजय डॉ. अमोल कोल्हे विजयी.

लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर शरद पवार गटाकडून अमोल कोल्हे यांची उमेदवारी जाहीर झाली होती .डॉ. कोल्हे यांची राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून उमेदवारी लवकर जाहीर झाल्याने कोल्हे यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली होती तर एकनाथ शिंदे गटाचे शिवाजीराव आढळराव पाटील यांची उशीरा ऐनवेळी अजित पवार गटाकडून उमेदवारी देण्यात आली .त्यामुळे शिवाजीराव आढळराव



पाटील प्रचारात डॉ.कोल्हे यांच्या पाठीमागे राहिले.

लोकसभेच्या निवडणुकीत दोन्ही उमेदवारांनी वैयक्तिक टिका करण्याची संधी सोडली नाही .डॉ .कोल्हे शरद पवार गटाशी एकनिष्ठ राहिले तर आढळराव पाटील ऐन वेळेला अजित पवार गटाकडून उमेदवारीसाठी पक्ष प्रवेश करून निवडणुक लढविली . त्यामुळे मतदारांमध्ये नाराजी होती . या निवडणुकीत आढळराव यांनी विकास कामे करूनही मतदारांनी त्यांना नाकारले .

शिरूर लोकसभा मतदारसंघात मतदार पक्षनिष्ठ उमेदवार म्हणून

**हा विजय शरद पवार साहेबांच्या मेहनतीचा व एकनिष्ठ कार्यकर्ते यांनी केलेली कष्ट तसेच शेतकऱ्यांच्या मालाला बाजारभाव नाही , दुधाला बाजारभाव , कांदा बाजारभाव , वाढती बेरोजगारी.याचा राग मतदारांनी मतपेटीतून काढला.**
**देवदत्त निकम (पुणे जिल्हा कार्याअध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस -शरद पवार गट )**


अमोल कोल्हे यांच्या पाठीशी उभे राहीले .शिरूर मतदार संघातील राष्ट्रवादीच्या विधानसभा मतदार संघातील आमदार यांची साथ असूनही शिवाजीराव आढळराव पाटील यांना मतदान झाले नाही.

शिरूर मतदार संघात उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर मतदार तसेच काँग्रेसचे मतदार आणि शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग असुन या मतदारसंघात मतदारांनी डॉ. कोल्हे यांना साथ दिली .शरद पवार व उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सहानुभूतीचा फायदा डॉ अमोल कोल्हे यांना झाल्याचे आजच्या निकालात स्पष्ट झाले.

दरम्यान शरद पवार गटाकडून अमोल कोल्हे यांची उमेदवारी जाहीर झाल्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हे यांना तू कसा निवडून येतो ते पाहतो असे खुले आव्हान दिल्याने शिरूर मतदार संघात हा जास्त चर्चेचा विषय ठरला होता . तसेच ऐनवेळेला उमेदवारीसाठी केलेला पक्षबदल त्याचा फटका आढळराव पाटील यांना या निवडणुकीत बसला . या निवडणुकीच्या दरम्यान शिवाजी आढळराव पाटील यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,अजित पवार यांच्या सभा झाल्या तर डॉ.कोल्हे यांच्यासाठी शरद पवार , सुप्रिया सुळे , आदित्य ठाकरे ,संजय राऊत , बाळासाहेब थोरात , रोहीत पवार आदी नेत्यांच्या सभा झाल्या .

**उद्धवसाहेब ठाकरे व शरद पवार यांना मतदारांची मिळालेली सहानुभूती व सर्वसामान्य जनता महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या पाठीमागे उभी राहिली.महाविकास आघाडीच्या कार्याकर्त्यांनी केलेल्या मेहनतीने विजय झाला.**
**धोंडीभाऊ भोर (आंबेगांव तालुका अध्यक्ष - राष्ट्रवादी शरद पवार गट )**

## के.एस.डी. शानभाग विद्यालय आणि ज्यु.कॉलेजच्या जलतरणपटूंचे जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत यश



**सातारा :** येथील श्याम सुंदरी चॅरिटेबल अँड रिलीजियस सोसायटीच्या के.एस.डी. शानभाग विद्यालय आणि कला ,वाणिज्य व विज्ञान शाखेच्या महाविद्यालयाचे खेळाडूंनी नुकत्याच कराड येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत विशेष यश मिळवले आहे.

या स्पर्धा रोटरी क्लब ऑफ कराड यांच्यावतीने संगम हेल्थ क्लब स्विमिंग पूल कराड येथे नुकत्याच संपन्न झाल्या .या स्पर्धेत विद्यालयाच्या इयत्ता नववीत शिकणाऱ्या कु. चित्राणी मुकुंद नवले हिने ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात पहिला क्रमांक मिळवला .आणि ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर प्रकारात दुसरा क्रमांक मिळवला तसेच ५० मीटर फ्रीस्टाइल प्रकारामध्ये तिने तृतीय क्रमांक मिळवून सोळा वर्षाखालील जलतरण स्पर्धेत ही यश मिळवले .

कु.आरोही रणजीत यवतकर या आठवी मध्ये शिकणाऱ्या मुलीने १०० मीटर फ्रीस्टाइल प्रकारात १६ वर्षाखालील गटामध्ये तृतीय क्रमांक मिळविला . ,,ऋशांत, रणजीत यवतकर याने ५० मीटर ब्रेक ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात तेरा वर्षाखालील मुलांच्या गटात दुसरा क्रमांक मिळवला. अर्णव किरण गायकवाड इयत्ता आठवीत शिकत असून याने तेरा वर्षाखालील गटात ५० मीटर फ्रीस्टाइल आणि १०० मीटर फ्री स्टाइल प्रकारांमध्ये तिसरा क्रमांक मिळविला .

या सर्व विजेत्या जलतरण स्पर्धकांना संयोजकांच्या वतीने प्रमाणपत्र व मेडल्स देऊन गौरवण्यात आले . जलतरण खेळामध्ये अतिशय उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या या खेळाडूंना फिरोज मुलाणी आणि रवी नाटेकर यांनी प्रशिक्षक म्हणून सुरेख मार्गदर्शन केले.

या सर्व जलतरण खेळाडूंचे विद्यालय व महाविद्यालयाचे संस्थापक व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक रमेश शानभाग ,संस्थेच्या संचालिका सौ. आचल घोरपडे ,विश्वस्त सौ. उषा शानभाग, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. रेखा गायकवाड प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भाग्येश कुलकर्णी तसेच पालक संघाचे प्रतिनिधी आणि शिक्षक शिक्षकांसह कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या .